# यावल महाविद्यालय मराठी सामान्यज्ञान स्पर्धा संपन्न
## प्रिती निळे सर्वप्रथम

यावल (प्रतिनिधी) येथील जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज मर्यादित जळगाव द्वारा संचलित कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील मराठी विभागामार्फत दिनांक 26 डिसेंबर 20 21 रोजी महाविद्यालयातील सर्व शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मराठी सामान्यज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते .या स्पर्धेत एकूण 213 विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला .

विद्यार्थ्यांच्या सामान्यज्ञानात भर पडावी, त्यांचा स्पर्धापरीक्षेच्या दृष्टीने सराव व्हावा व त्यांच्यात चौफेर वाचनाची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने सदर स्पर्धेचे आयोजन प्रभारी प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांच्या प्रेरणेतून करण्यात आले होते .या स्पर्धेत  प्रिती निळे (एस वाय बी एससी )प्रथम,  दिव्या निळे (एफ वाय बी एससी )द्वितीय व रिजवान तडवी (एफ वाय बी एससी) याने तृतीय क्रमांक पटकावला. तसेच  सोनल वाघ (एस वाय बी कॉम) व   अश्विनी गजरे( एफ वाय बी ए )यांना उत्तेजनार्थ बक्षीस घोषित करण्यात आले .विजयी स्पर्धकांना यथावकाश ग्रंथ स्वरूपात पारितोषिके प्रदान करण्यात येतील .सदर स्पर्धेचे आयोजन मराठी विभाग प्रमुख डाॅ. सुधा खराटे यांनी केले होते .

यशस्वी स्पर्धकांचे उपप्राचार्य प्रा.ए. पी. पाटील ,प्रा .एम .डी .खैरनार, श्री संजय पाटील ,विभागाचे सहकारी श्री सुभाष कामडी ,सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बंधु भगिनींनी अभिनंदन केले.

